जनप्रवास



■ जयसिंगपूर येथे डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजच्या निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत शिक्षक

# डॉ. जे. जे. मगदूम फार्मसीच्या अकरा विद्यार्थ्यांची कंपनीत निवड

**जनप्रवास । जयसिंगपूर**

येथील डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजच्या अंतिम वर्ष बी. फार्मसीच्या ११ विद्यार्थ्यांची टेककेअर मेडिकल सर्विसेस प्रा. लि. या कंपनीच्या पुणे आणि मुंबई येथील शाखांमध्ये मेडिकल रेकॉर्ड एक्झिक्युटिव्ह या पदासाठी निवड झाली. या विद्यार्थ्यांना ३ लाख वार्षिक पगार दिला जाणार आहे. यामध्ये आरती लोहार, आकांक्षा अठावले, अंजनादेवी वैश्णव, अनुष्का कागले, अपूर्वा चौगुले, भाग्यश्री पाटील, मैथिली उपाध्ये, निकिता पोवार, प्राजक्ता जाधव, रुतिक पुजारी आणि संस्कृती देसाई या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामध्ये प्राचार्य डॉ. शीतलकुमार पाटील कॉलेजचे ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट ऑफिसर विनोद पाटील, उपप्राचार्य डॉ. सतीश किलजे आणि प्रा. सौरभ समडोळे यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील संधी, मुलाखतीतील तयारी आणि व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले. तसेच डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विजय मगदुम व उपाध्यक्षा अॅड. डॉ. सोनाली मगदूम यांनी विद्यार्थ्यांना पुढील यशस्वी भवितव्याबाबत शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या उज्ज्वल करिअरसाठी सदिच्छा व्यक्त केल्या.